KOLHAPUR ENGINEERING ASSOCIATION

अयर्थाथ महत्वकांशा व असमाधानामुळे निर्माण होणार तणाव

टाळा-अदृश्य श्री.काडसिध्देष्वर स्वामी.

मानवी जीवनात आशा,आकांशा,महत्वकांशा आसाव्यात परंतु अयर्थात महत्वकांशा आणि असमाधानी स्वभावामुळे तणाव वाढतो त्यामुळे अशा गोष्टीमुळे होणारा तणाव टाळावा असे आवाहन कणेरी मठाचे 49 वे मठाधिपती पूज्यश्री अदृष्य काडसिध्देश्वर स्वामीजी यांनी केले. ते कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या ''ताण-तणावाचे नियोजन कसे करावे ? '' या विषयावर बोलत होते.

आपल्या जिवनात जेंव्हा निसर्ग, शासन,प्रशासनांकडून जेंव्हा साथ मिळत नाही तेंव्हा तणाव निर्माण होतो. त्याच बरोबर स्पर्धा,भ्रम तसेच आपल्या पेक्षा दुस-याला अधिक मिळाले या तुलनेमुळे तणाव जास्तच वाढतो. आपल्या जवळची, दूरची माणसें जेंव्हा दगा-फटका करतात तेंव्हा ताण येतो. जीवनात कसे जगावे याची योजना नसेल, दिशा स्पष्ट नसेल तर तणाव निर्माण होतो आणि आशाच परिस्थितीत आपण धावत राहतो, कशासाठी धावतो आहोत ? हे जेंव्हा कळत नाही तेंव्हा तणाव निर्माण होतो.

आपले ध्येय आणि उदिष्टये विसरू नका. हा रस्ता सोपा नाही. आपल्या वाटेत अनेक प्रलोभणे पडलेली आहेत ती ओलांडणे कठिण आहे, त्यामुळे इथेच अडकूण पडू नका. ध्येय विसरू नका एवढेच करा, त्यामुळे तणाव कमी होण्यास सुरवात होते. ज्या रस्त्याने आपण जाणार आहोत त्याचे ज्ञान पाहिजे. आपण कुणाचेतरी अनुकरण करत चालत असतो. व्यक्ती, काल, स्थळ,परिस्थिती नुसार तणाव बदलत असतो तसेच असमाधान हे तणावाचे मुख्य कारण आहे.

आपल्या जिवनातील अनेक गोष्टी नाश होणार आहेत तसेच आपल्या जिवनाचाही शेवट होणार आहे. ज्या गोष्टी अनिवार्य आहेत त्या आपण समजून घ्याव्यात. दुस-याचे वाईट झाले की आनंद होतो, हा मानवी स्वभाव आहे. तेंव्हा कोणावरही हसू नहा. मित्र व शत्रू यांचा समतोल राखा. आपल्या प्रयत्नाला काळाने साथ द्यायची असते, आपण प्रयत्न करत रहायचे, खचून जावू नका. एक चिमणी सुध्दा घरटे बांधताना अनेक वेळा तीच्या चोचितील काढया वा-याने उडून जातात म्हणून ती प्रयत्न करणे कदापी सोडत नाही व ती घरटे बांधूनच थांबते अशी आपली जिद्द पाहिजे.

आपला आत्मविश्वास अजिबात ढळू देवू नका. कोणतेही काम मी स्वतःच्या आनंदसाठी व समाधानासाठी करतो आहोत असे मानून काम करा. इतरांना आनंद मिळतो म्हणून काम करू नका. देवाने एकदा जनावरांना त्यांच्या समस्या विचारल्या परंतु कोणत्याही जनावराने किंवा जंगलातील प्राण्याने समस्या सांगितली नाही आंम्ही सर्व समाधानी आहोत असेच उत्तर सर्व प्राण्यांनी दिले. त्यानंतर देवाने मानवाला विचारले की तुझा काय समस्या आहेत त्या सांग.

तेंव्हा मानवाने अनेक समस्यांचा पाढाच वाचला. या घटनेमध्ये मानव अनुकुलते पेक्षा समस्यांच जास्त सांगतो त्यामुळे तणावात सतत भर पडत जाते व दुखःचे कारण बनते इतर कोणतेही कारण नाही.

एखादयाला साधे पिटलं सुध्दा अतिशय आवडते परंतु एखाद्याला पिटलं बघितले तरी उलटी होते, आता यामध्ये या पिटल्यांचा काय दोष ? इथ सुख आणि दुःख मानण्यावर आहे. आपण मानले तर सुख आहे नाहीतर मरेपर्यंत आपण सुखी होणार नाही. आपण केलेल्या कर्माचे फळ आपल्यालाच मिळणार आहे ते दुस-याला मिळणार नाही हे ध्यान्यात ठेवा. ॲक्शनला रिॲक्शन ठरलेली आहे. आपण समजूतदार आहोत जनावरे नाही. माणसाने नेहमी मधमाश्याप्रमाणे काम करावे, नदीसारखे सतत वाहत रहावे आणि पक्षा सारखे गात रहावे. ज्या ठिकाणी आपले मन रमते तसेच आपणास ज्या ठिकाणी अधिक थांबावेसे वाटते त्या ठिकाणी थांबावे. माणूस नेहमी आयुष्यभर विद्यार्थी असतो आणि विद्यार्थ्यीच राहतो. आपण नेहमी शिकत राहीले पाहिजे. नदीने वाहने सोडून दिले तर काय होईल ? पाणी खराब होईल. त्यामुळे आपण सतत शिकत राहीले पाहिजे.

यानंतर उपस्थितांनी विचारलेल्या प्रश्नांना स्वामीजींनी उत्तरे दिली. व्याख्यानाच्या सुरवातीस स्वामीजींनी असोसिएशनच्या स्थापनेबाबत गौरव उद्गार काढले आणि म्हणाले स्वातंत्रपुर्व काळात समाजाची गरज होती आणि ती असोसिएशने पुर्ण केली. तीन पिढयांनी उद्योग क्षेत्रात अतिशय उत्तम कामगिरी केली. व्यक्तीगत विकासा बरोबरच राष्ट्राचाही विकास साधण्यास त्यांनी हातभार लावला आहे. अश्या परिस्थितीत असोसिएशने केलेले कार्य ही अभिमानाची गोष्ट आहे.

स्वामीजींनी स्वातंत्र मिळण्यापुर्वी भारत-पाकिस्तान फाळणीच्यावेळी झालेल्या कांही गोष्टींचा या ठिकाणी उल्लेख केला.

व्याख्यानाच्या सुरवातीस अध्यक्ष श्री.सचिन मेननसोा यांनी प्रस्ताविक केले व स्वामीजींच्या कार्याचा माहिती दिली. तसेच त्यांच्या हस्ते स्वामीजींचा शाल,श्रीफळ,पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. आभार प्रदर्शन सचिव श्री.दिनेश बुधले यांनी मानले, सूत्रसंचलन सेक्रेटरी श्री.प्रदीप व्हरांबळे यांनी केले.

यावेळी सर्वश्री.सचिन मेनन,हर्षद दलाल,दिनेश बुधले,प्रसन्न तेरदाळकर,कमलाकांत कुलकर्णी,श्रीकांत दुधाणे,रणजीत शाह,बाबासो कोंडेकर, अतुल आरवाडे, अमर करांडे, जयदिप मांगोरे, अभिषेक सावेकर, संजय पेंडसे, मुबारक शेख, सुरेंद्र जैन, जयराजभाई वसा,ॲड.अशोक उपाध्ये, हरिशचंद्र धोत्रे, मोहन कुशिरे, विजय सोमाणी, चंद्रकांत चोरगे, गणेश आपटे, सुशिल हंजे, एस.एस.माने, डॉ.ए.एम.गुरव, नलीनी नेने, अशोकराव चव्हाण, सुरेश मंडलिक, संदिप मांगारे, किरण चरणे, प्रदीपभाई कापडिया, संगिता नलवडे, हिंदूराव कामते,पुर्वांक दलाल,साधना देशिंगकर, लालासो गायकवाड, अरिफ शेख, अबुबकर शेख, प्रशांत मोरे, मिलींद सार्दळ, राम कंुभार,भगवान मुडळे, अमित सरंजामे इ.उपस्थित होते.


कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन


कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन
उद्योगपती माधवराव बुधले सभागृह
कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन
व्याख्यान
ताणतणावाचे नियोजन कसे करावे ?
कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन





